आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
११ मे २०२६ -सोम वार

**ठळक बातम्या**

- भविष्यातल्या आर्थिक नेतृत्वासाठी महाराष्ट्र सक्षम होत असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही

- विकसित भारत जी रामजी कायद्याची अधिसूचना प्रसिद्ध, १ जुलैपासून अंमलबजावणी सुरू होणार

- देशात पेट्रोलियम उत्पादनांचा तुटवडा नसून ६० दिवस पुरेल इतका कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारकडून स्पष्ट

- नाशिकमधल्या टी सी एस महिला अत्याचार प्रकरणी आरोपी निदा खानला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ३१३ अंकांची घसरण, रूपयामध्ये ८२ पैशांची घसरण

<><><><><>

पायाभूत सुविधा, नाविन्यपूर्णता, स्वच्छ ऊर्जा, तंत्रज्ञान आणि संस्थात्मक विश्वास या घटकांवर भविष्यातील आर्थिक नेतृत्व निश्चित होणार असून महाराष्ट्र त्यासाठी आवश्यक इकोसिस्टीम उभारत आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री CII आयोजित ‘वार्षिक व्यवसाय शिखर परिषद 2026’ अंतर्गत झालेल्या ‘Vision For India @100’ परिसंवादात आज ते बोलत होते. भारतात येणाऱ्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी जवळपास ४० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. महाराष्ट्र ६६० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था असून २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवण्याचे लक्ष्य असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यात अभूतपूर्व वेगाने गुंतवणूक होत असल्याचं स्पष्ट करून मुख्यमंत्री म्हणाले, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, समृद्धी महामार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, वाढवण बंदर आणि मेट्रो प्रकल्पांमुळे राज्याचा आर्थिक भूगोल बदलत असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र

देशातल्या ६० टक्के डेटा सेंटर्सचं केंद्र असून ईव्ही, एआय, सेमीकंडक्टर्स आणि ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्समध्ये राज्य आघाडीवर असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं. नागपूर देशाचं लॉजिस्टिक हब, तर गडचिरोली २०३२ पर्यंत भारतातील सर्वात मोठा ग्रीन स्टील उत्पादक जिल्हा बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी CII चे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी उपस्थित होते.

<><><><>

विकसित भारत जी रामजी अर्थात  विकसित भारत रोजगार आणि आजिविका मिशन ग्रामीण कायदा २०२५ लागू करण्यासंदर्भात केंद्र सरकारनं आज अधिसूचना जारी केली. येत्या १ जुलै पासून देशभरात हा कायदा लागू होणार आहे. या कायद्यानुसार ग्रामीण भागात प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १२५ दिवस रोजगार मिळण्याची खात्री असेल. केंद्रीय मंत्री शिवराज चौहान यासंदर्भात म्हणाले.

**- होल्ड - शिवराज चौहान बाइट - - -**

<><><><>

देशात पेट्रोलियम पदार्थांचा कोणताही तुटवडा नसून ६० दिवस पुरेल इतक्या कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. पश्चिम आशिया संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या अनौपचारिक मंत्रीगटाच्या पाचव्या बैठकीनंतर अध्यक्ष संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी ही माहिती दिली. देशात ४५ दिवस पुरेल इतका स्वयंपाकाचा गॅस आणि ६० दिवस पुरेल इतका नैसर्गिक वायु उपलब्ध असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. देशात ७०३ अब्ज अमेरिकन डॉलर इतकं परकीय चलन उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

<><><><>

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज आय आय टी मुंबई इथं हवेतला कार्बन डायऑक्साइड जमा करून साठवण्याच्या प्रायोगिक तत्त्वावरच्या प्रकल्पाचं, आणि यासाठीच्या खनन प्रक्रियेचं उद्घाटन केलं. या प्रकल्पात कार्बनडाय ऑक्साइडपासून कॅल्शियम कार्बोनेट तयार करून पोलाद, रंग, सिमेंट आणि घरबांधणी उद्योगांमध्ये चुन्याऐवजी त्याचा वापर केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रधान यांनी दिली. कार्बन उत्सर्जनाच्या जागतिक समस्येवर तोडगा काढणाऱ्या आय आय टी मुंबईच्या चमूचं त्यांनी अभिनंदन केलं.

येत्या काही दिवसांत हा प्रकल्प व्यावसायिक तत्त्वावर कार्यान्वित केला जाईल आणि पुढच्या महिन्यात फ्रान्समध्ये होणाऱ्या भारत इनोव्हेट्स परिषदेत हा प्रकल्प सादर केला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

<><><><><>

कितीही आक्रमक आले तरी सनातन संस्कृतीचा कधीही अंत होऊ शकत नाही याचं सोमनाथ मंदिर हे ठळक उदाहरण आहे, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं आहे. ते आज मुंबईत 'सोमनाथ स्वाभिमान पर्वाच्या निमित्तानं महालक्ष्मी इथल्या श्री धाकलेश्वर महादेव मंदिरात अभिषेक आणि पूजा केल्यानंतर उपस्थितांना संबोधित करत होते. सौराष्ट्रातलं सोमनाथ हे केवळ मंदिर नसून देशाच्या आत्म्याचं प्रतीक आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

नाशिक शहरातल्या टी सी एस मधल्या महिला अत्याचार प्रकरणातली आरोपी निदा खान हिला आज नाशिक रोडच्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. याआधी तिला पोलीस कोठडी देण्यात आली होती. तिची मुदत संपल्यानं आज तिला न्यायालयात हजर करण्यात आलं.

<><><><><>

नाशिकमधल्या टीसीएस कंपनीतल्या प्रकरणात पॉश कायद्याची अजिबात अंमलबजावणी झाली नाही, असा अहवाल राष्ट्रीय महिला आयोगानं नेमलेल्या समितीनं दिला आहे. कंपनीच्या नाशिक शाखेत कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात मानसिक आणि शारीरिक छळ झाल्याचंही या अहवालात म्हटलं आहे. शुक्रवारी आयोगानं हा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना सादर केला. या प्रकरणातल्या पीडित, पॉश समितीचे सदस्य, पोलिस आणि इतर संबंधितांशी चर्चा करुन आयोगाच्या समितीनं हा अहवाल तयार केला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेलं काटकसरीचं आवाहन तसंच इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधीवर सहमती होऊ न शकल्याचा फटका देशातल्या शेअर बाजारांना मोठ्या प्रमाणात बसला. सेन्सेक्स आज १ हजार ३१३ अंकांनी घसरुन ७६ हजार १५ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३६० अंकांची घट नोंदवून २३ हजार ८१६ अंकांवर बंद झाला. ग्राहकोपयोगी

वस्तू, बांधकाम उद्योग, सराफ व्यावसायिक, विमान कंपन्या यांचे समभाग आज मोठ्या प्रमाणात घसरले.

डॉलरच्या तुलनेत रुपया आज ८२ पैशांनी घसरला. त्यामुळे विनियम चलन बाजारात एका डॉलरसाठी ९५ रुपये ३१ पैसे मोजावे लागत होते.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. धर्मशाला इथं एचपीसीए मैदानावर थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये यंदापासून दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीचा नवा अभ्यासक्रम लागू होणार आहे. त्यासाठी बालभारती नव्या अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकं प्रकाशित करणार आहे. पालकांनी नव्या अभ्यासक्रमाचीच पुस्तकं खरेदी करावीत, असं आवाहन ‘बालभारती’च्या संचालिका अनुराधा ओक यांनी केलं आहे.

<><><><>

राज्यातल्या चित्रपट उद्योगाला चालना देण्याबरोबरच निर्माते आणि निर्मिती संस्थांच्या विविध अडचणी आणि प्रश्न सोडवण्यासाठीच्या प्रोत्साहनपर धोरणाचा अभ्यास करण्यासाठी तीन तज्ञांची समिती स्थापन करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले आहेत. ते आज हिंदी चित्रपट निर्माते आणि निर्मिती संस्थांबरोबर घेतलेल्या बैठकीत बोलत होते. या समितीनं देशातली विविध राज्यं तसंच परदेशात चित्रपट उद्योगासाठी दिल्या जाणाऱ्या सवलती, अनुदान आणि प्रोत्साहन योजनांचा अभ्यास करून तीन महिन्यांत अहवाल सादर करावा. असं त्यांनी सांगितलं.

यावेळी ज्येष्ठ अधिकाऱ्यांसह अनेक निर्मिती संस्थांचे प्रतिनिधी आणि निर्माते उपस्थित होते.

<><><><>

गेल्या २४ तासात कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. इतरत्र हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**